**केंद्र शासनाच्या किमान आधारभूत योजनेंतर्गत हमीभाव खरेदी प्रक्रीया राबविण्यासाठी येणाऱ्या अनुषंगीक खर्चासाठी कार्यरत दोन योजनांच्या नावात बदल करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सपस-२०२६ /प्र.क्र.२१/२४-स**
मंत्रालय विस्तार रूम नं. ३५३, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२
दिनांक : १३ एप्रिल, २०२६

**संदर्भ :-** प्रधान महालेखाकार (लेखा व हकदारी), मुंबई यांचे दिनांक ०८ एप्रिल, २०२६ रोजीचे पत्र

**प्रस्तावना-**

केंद्र शासनाच्या PM-AASHA योजनेअंतर्गत (PSS, MSP, PSF,) शेतमालाच्या खरेदीसंदर्भात केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाने ऑक्टोबर, २०१८ मध्ये मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांनुसार किमान आधारभूत योजना ( Price Support Scheme) अंतर्गत कडधान्य व तेलबिया यांची राज्यस्तरीय नोडल संस्थांमार्फत हमीभाव खरेदी प्रक्रिया राबविण्यात येते.

सदर मार्गदर्शक सूचनांमध्ये हमीभाव खरेदीच्या अनुषंगाने राज्य शासनाकडून विविध उपाययोजना करण्याबाबत सूचित करण्यात आलेले आहे.

यास्तव, सदर उपाययोजनांवर होणारा खर्च मागणी क्र. व्ही-२ लेखाशिर्ष २४२५ २३७३ (कार्यक्रम) व २४२५ २४१७ (अनिवार्य) या अंतर्गत करण्यात येणार असल्याने सदर प्रयोजनासाठी योजनेच्या नावात योजनारुप बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**

किमान आधारभूत खरेदी योजनेंतर्गत राज्यातील हमीभाव खरेदी प्रक्रीया राबविण्याच्या अनुषंगाने मागणी क्र. व्ही-२ लेखाशिर्ष २४२५ २३७३ (कार्यक्रम) व मागणी क्र. व्ही-२ लेखाशिर्ष २४२५ २४१७ (अनिवार्य) या योजनेच्या नावामध्ये बदल करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

०२. सदर शिर्षामध्ये प्रधान महालेखाकार(लेखा व हकदारी), मुंबई यांनी उपनिर्दिष्ट संदर्भाधीन पत्रान्वये दिलेल्या मान्यतेनुसार खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | सद्याचे शिर्ष | | नवीन शिर्ष | |
|---|---|---|---|---|
| १. | २४२५सहकार | 2425, Cooperation | २४२५सहकार | 2425, Cooperation |
| | (१०८)इतर सहकारी पत संस्थांना सहाय्य | (108) Assistance to Other Co-operatives | (१०८)इतर सहकारी पत संस्थांना सहाय्य | (108) Assistance to Other Co-operatives |
| | (०१)पणन सहकारी संस्था | (01)Marketing Co-operatives | (०१)पणन सहकारी संस्था | (01)Marketing Co-operatives |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (०१)(२१) महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघास रासायनिक खते खरेदी करणे व त्यांचा पुरवठा करणे यासाठी येणाऱ्या अनुषंगिक खर्चासाठी अर्थसहाय्य (कार्यक्रम) (२४२५ २३७३)<br>३३- अर्थसहाय्य<br>४५-व्याज<br>५०-इतर खर्च | (01)(21) Subsidy to Maharashtra State Cooperative Marketing Federation Ltd. for ancilliary expenditure on account of purchase and supply of Chemical Fertilizers(Scheme) (2425 2373)<br>33- Subsidies<br>45- Interest<br>50- Other Charges | (०१)(२१) रासायनिक खते खरेदी व पुरवठा करणे तसेच शेतीमाल खरेदी,साठवणूक व इतर अनुषंगिक खर्चासाठी अर्थसहाय्य (कार्यक्रम)<br>३३-अर्थसहाय्य<br>४५-व्याज<br>५०-इतर खर्च | (01)(21) Subsidy for purchase and supply of chemical fertilizers as well as purchase, storage of agricultural produce and other ancillary expenses (Scheme)<br>33- Subsidies<br>45-Interest<br>50- Other Charges |
| २. | २४२५सहकार | 2425, Cooperation | २४२५सहकार | 2425, Cooperation |
| | (१०८)इतर सहकारी पत संस्थांना सहाय्य | (108) Assistance to Other Co-operatives | (१०८)इतर सहकारी पत संस्थांना सहाय्य | (108) Assistance to Other Co-operatives |
| | (०१)पणन सहकारी संस्था | (01)Marketing Co-operatives | (०१)पणन सहकारी संस्था | (01)Marketing Co-operatives |
| | (०१)(२२) महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघास नाफेडमार्फत खरेदी केलेल्या शेतमालाची रक्कम अदा करण्याकरिता येणाऱ्या अनुषंगिक खर्चासाठी अर्थसहाय्य (अनिवार्य) (२४२५ २४१७) | (01)(22)Subsidy to Maharashtra State Cooperative Marketing Federation Ltd. for ancillary expenditure on account of making payment of farmers produce purchased through NAFED.(Committed) (2425 2417) | (०१)(२२) खरीप व रब्बी हंगामातील पिक खरेदीच्या अनुषंगाने अनुषंगिक खर्चासाठी अर्थसहाय्य(अनिवार्य) | (01)(22) Subsidy for incidental expenses related to crop procurement in Kharif and Rabi seasons (Committed) |

०३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६०४१३१७५२१७०२०२ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरी करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by ANIROODHA SURYAKANT DESHPANDE
Date: 2026.04.13 17:54:27 +05'30'

**(अनिरुध्द देशपांडे)**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति:-**

१. मा.मंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव(वित्त) मंत्रालय, मुंबई

३. सचिव(नियोजन), मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव (सहकार व पणन), मंत्रालय, मुंबई
५. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. प्रधान महालेखाकार (लेखा व हकदारी), कार्यालय, मुंबई
७. व्यस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई,
८. सह सचिव (पणन),मंत्रालय, मुंबई पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
९. सह सचिव (अर्थसंकल्प), १७ स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे
११.राज्यप्रमुख, नाफेड, नमन सेंटर, ए -वींग, बांद्रा कुर्ला कॉम्पलेक्स, मुंबई
१२.कक्ष अधिकारी (रोखशाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.निवड नस्ती २४ स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.